MHKO110008322024

# म.कौ.हि.स.अ. अर्ज क्र. १७/२०२४.

(CNR No.**MHKO110008322024**)

## निशाणी क्रमांक ०४ खालील आदेश.

(ज्योती घागरे वि. साईराज घागरे वगैरे)

प्रस्तुत प्रकरण अर्जदार - ज्योती साईराज घागरे हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये सादर करून प्रस्तुत अर्ज अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कलम २३ अंतर्गत दाखल केलेला आहे.

## अर्जदार हिचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे : -

०२. अर्जदार हिचा विवाह गैरअर्जदार क्र.१ – साईराज विक्रांत घागरे यांच्याशी मुंबई येथे दिनांक ०६/११/२०२२ रोजी हिंदू धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे झाले असून त्याचे लग्नसंबंध अद्यापही कायम आहेत. यातील गैरअर्जदार क्र.२ हे अर्जदार हिचे सासरे असून गैरअर्जदार क्र.३ ही तिची सासू आहे. अर्जदार हिच्या आई वडिलांनी त्यांच्या ऐपतीप्रमाणे खर्च करून त्यांचे लग्न लावून दिले होते.

०३. विवाह ठरविताना गैरअर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.१ याचा जिमचा व्यवसाय असल्याचे व त्याला सदर व्यवसायातून मासिक रक्कम रू. एक लाख रुपये उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले होते. तसेच दादर येथे दोन कोटीची प्रॉपर्टी असल्याचे सांगितले होते. त्यानंतर त्यांच्या एकमेकाच्या पसंतीनुसार साखरपुडा व विवाह कार्यक्रम पार पडला होता. मात्र विवाहानंतर गैरअर्जदार क्र.१ हे वारंवार दारू पिऊन घरी येत असता व अर्जदार हिच्याशी भांडणतंटा करत असत. तसेच

गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिच्याशी बोलणे टाळून, तिच्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याचे टाळू लागला व तिला शारिरीक व मानसिक त्रास देऊ लागला. त्यानंतर दिनांक ०६/०४/२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ यांच्या मावशीकडून अर्जदार हिला, गैरअर्जदार क्र.१ याचे एका सुवर्णा सरगर नावाच्या महिलेशी विवाहबाह्य संबंध असल्याचे समजले. त्यानंतर, दिनांक ०४/०६/२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ हा सदर महिलेकडे राहण्यास गेला व त्याने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार हिचा त्याग केला आहे.

०४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी गैरअर्जदार क्र.१ याच्या सर्व कृत्यांकडे दुर्लक्ष केले व अर्जदार हिला माहेरहून वेगवेगळ्या वस्तू आणण्यासाठी तगादा लावला. तसेच, गैरअर्जदार हे अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागले. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी अर्जदार हिला घर सोडून जाण्यासाठी शिवीगाळ केली, मारहाण केली व सतत त्रास देऊन धमकावले आहे. त्यानंतर दिनांक ११/०१/२०२४ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचे सर्व दागिने त्यांच्याकडे ठेऊन तिला घराबाहेर काढले व तिचा त्याग केला. त्यावेळी, अर्जदार हिने मध्यस्थांमार्फत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला असता त्याला गैरअर्जदार यांनी कोणतीही दाद दिली नाही. तसेच त्यांनी आजतागायत अर्जदार हिच्या उदरनिर्वाहासाठी किंवा उपजीविकेसाठी कोणतीही मदत केलेली नाही.

०५. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा त्याच्या जिमच्या व्यवसायातून दरमहा दोन लाखाचे उत्पन्न मिळवत आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या दादर येथील प्रॉपर्टीमधून दरमहा पन्नास ते साठ हजार भाडे मिळवित आहेत. असे असताना देखील गैरअर्जदार हे अर्जदार हिला नांदविण्यास जाणून बुजून टाळाटाळ करत आहेत. अर्जदार हिच्या कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे, अर्जदार हिला तिच्या उदरनिर्वाहासाठी व औषधोपचारासाठी तिच्या वडिलांवर अवलंबून राहावे

लागत आहे. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल करून तिला गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार) इतकी अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे. तसेच, अर्जदार हिने तिला नुकसानभरपाई व दरमाहा भाडे मिळण्याची देखील विनंती केली आहे.

०६. गैरअर्जदार क्र.०१ यांना प्रस्तुत प्रकरणाची नोटीस लागू होऊन देखील ते प्रकरणामध्ये हजर झाले नाहीत. त्यामुळे, दिनांक ०४/१२/२०२४ रोजीच्या निशाणी क्र.०१ खालील आदेशान्वये सदरचा अर्ज हा त्यांच्या विरुद्ध एकतर्फा चालविण्यात आला आहे.

०७. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी **निशाणी क्र.१८** वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह मान्य केला आहे. मात्र इतर सर्व मजकूर त्यांनी नाकारलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्या विवाहामध्ये अर्जदार हिच्या घरच्यांनी कोणताही खर्च केलेला नाही. तसेच, गैरअर्जदार यांनी केलेले दागिने देखील अर्जदार हिच्याच ताब्यात आहेत. तसेच, साखरपुडा व विवाहासाठी देखील गैरअर्जदार यांनी संपूर्ण खर्च केला आहे. विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदण्यास आल्यानंतर ती, घरातील कोणतेही काम न करता, मोठ्या लोकांना अपमानास्पद बोलत होती. तसेच, तिचे वागणे हे विक्षिप्त होते. याबाबत गैरअर्जदार यांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला असता, अर्जदार ही त्यांच्याशी भांडणतंटा करत असे.

०८. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही तासनतास फोनवर बोलत असे व कोणतेही काम नसताना माहेरी जात असे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ याच्या अनैतिक संबंधाबाबत केलेली विधाने देखील खोटी

असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अर्जदार हिच्या त्रासामुळे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांची प्रकृती वारंवार बिघडत असून, अर्जदार ही त्यांची कोणतीही काळजी घेत नाही. तसेच, अर्जदार ही स्वतः कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय गैरअर्जदार यांचा त्याग करून तिच्या माहेरी निघून गेली आहे. गैरअर्जदार हे तिला आणण्यासाठी तिच्या माहेरी गेले असता, अर्जदार हिने, ती परत येणार नसल्याचे त्यांना सांगितले. तसेच, गैरअर्जदार यांनी मध्यस्थांमार्फत केलेल्या सर्व प्रयत्नांना अर्जदार हिने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच, अर्जदार ही स्वतः तिचे सर्व दागिने, कपडेलत्ते घेऊन तिच्या माहेरी गेली असल्यामुळे, तिच्या ह्या वागण्याने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना खूपच मानसिक त्रास झालेला आहे. सबब, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी अर्जदार हिचा प्रस्तूतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०९. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ **निशाणी क्र.०३** सोबत तिने तिच्या आधारकार्डची छायांकित प्रत, लग्नाची यादी, लग्नाची पत्रिका व लग्नाचे फोटो हजर केले आहेत. तसेच, अर्जदार हिने **निशाणी क्र.१७** वर तिचे मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

१०. अर्जदार व गैरअर्जदार क्र.२ व ३, तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी सादर केलेल्या कथनांवरून व युक्तिवादावरुन प्रस्तुतच्या अंतरिम अर्जासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आहेत व त्या मुद्द्यांना मी माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी अर्जदार हिचा कौटुंबिक छळ झाल्याचे दिसून येते काय ? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २ | अर्जदार हिचे स्वतंत्र उत्पन्न नसल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येते काय ? | **होकारार्थी.** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रू.५०,०००/- (पन्नास हजार रुपये) मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार.** |

## कारणमिमांसा.

### मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत -

११. सदरचे तीनही मुद्द्यांबाबत एकत्रित कथन आल्याने त्यांचे विवेचन मी एकत्रित देत आहे.

१२. सदरचे प्रकरण हे घरगुती अत्याचारापासून महिलांचे रक्षण करण्याच्या कायद्याच्या कलम १२ अन्वये दाखल केले असून प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कलम २३ अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जातील कथने ही मूळ प्रकरणासाठी पुराव्यावर शाबीत होणे आवश्यक आहे. परंतु, कलम २३ अंतर्गत अर्जाचा विचार करतांना दोन्ही पक्षकारांची राहण्याची व त्यांच्या उत्पन्नाची स्थिती याचा विचार करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने अर्जातील कथने विचारात घेता अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यात पती-पत्नी नाते आजही अस्तित्वात असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरची बाब मान्य केलेली आहे.

१३. प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. अर्जातील कथने पाहता त्यामध्ये वेगवेगळया घटनांची माहिती नमूद केली आहे. सदरची कथने ही, पुराव्याच्या कक्षेत सिद्ध होणे आवश्यक आहेत. अर्जदार तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, विवाहानंतर गैरअर्जदार क्र.१ हे वारंवार दारू पिऊन अर्जदार हिच्याशी भांडणतंटा करत होता. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिच्याशी बोलणे टाळून, तिच्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याचे टाळत होता व तिला शारिरीक व मानसिक त्रास देत होता. गैरअर्जदार क्र.१ याचे एका सुवर्णा सरगर नावाच्या महिलेशी विवाहबाह्य संबंध होते, व दिनांक ०४/०६/२०२३ रोजी पासून गैरअर्जदार क्र.१ हा सदर महिलेकडे रहाण्यास आहे व त्याने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार हिचा त्याग केला आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी गैरअर्जदार क्र.१ याच्या सर्व कृत्यांकडे दुर्लक्ष केले व अर्जदार हिला माहेरहून वेगवेगळ्या वस्तू आणण्यासाठी, अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन अर्जदार हिला घर सोडून जाण्यासाठी शिवीगाळ केली, मारहाण केली व सतत त्रास देऊन धमकावले आहे. त्यानंतर दिनांक ११/०१/२०२४ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचे सर्व दागिने त्यांच्याकडे ठेऊन तिला घराबाहेर काढले व तिचा त्याग केला आहे. तसेच, अर्जदार हिने मध्यस्थांमार्फत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला असता त्याला गैरअर्जदार यांनी कोणतीही दाद दिली नाही. तसेच त्यांनी आजतागायत अर्जदार हिच्या उदरनिर्वाहासाठी किंवा उपजीविकेसाठी कोणतीही मदत केलेली नाही.

१४. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये व युक्तिवादामध्ये अर्जदार हिची सर्व कथने नाकारलेली आहेत. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार ही सद्यःस्थितीत गैरअर्जदार यांच्यासोबत राहात नसल्याचे अवलोकित होते. अशा परिस्थितीत गैरअर्जदार क्र.१ यांनी तिच्या पालनपोषणासाठी

ठरावीक रक्कम पाठविली, अर्थसहाय्य केले अशा आशयाचे कोणतेही कथन किंवा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, अर्जदार हिचे आर्थिक शोषण झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलेचे संरक्षण कायद्याच्या कौटुंबिक हिंसाचार या व्याख्येत, आर्थिक शोषण याचा अंतर्भाव कलम ३( स्पष्टीकरण ४) मध्ये केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब सकृतदर्शनी समोर येते.

१५. अर्जदार तर्फे विधिज्ञांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, अर्जदार हिच्या कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच, अर्जदार हिचा त्याग केल्यापासून आजतागायत तिच्या उदरनिर्वाहासाठी किंवा उपजीविकेसाठी गैरअर्जदार यांनी कोणतीही मदत केलेली नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा त्याच्या जिमच्या व्यवसायातून दरमहा दोन लाखाचे उत्पन्न मिळवत आहे. तसेच दादर येथील प्रॉपर्टीमधून दरमहा पन्नास ते साठ हजार भाडे मिळवित आहे. असे असताना देखील गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिला नांदविण्यास जाणून बुजून टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे, अर्जदार हिला तिच्या उदरनिर्वाहासाठी व औषधोपचारासाठी तिच्या वडिलांवर अवलंबून राहावे लागत आहे. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये तसेच युक्तिवादामध्ये गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाबाबतची कथने नाकारलेली नाहीत. तसेच, ती खोडून काढण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. तसेच, अर्जदार हिला तिच्या उपजीविकेसाठी तिच्याकडे साधन उपलब्ध असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ याने उपस्थित होऊन त्याचे म्हणणे न दिल्यामुळे अर्जदार हिच्या कथनांवर अविश्वास ठेवावा, असे कोणतेही कारण समोर येत नाही. तसेच, गैरअर्जदार क्र.१ याचे अर्जदार हिचा पती या नात्याने पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक दायित्व आहे. तसेच, ते पूर्ण करण्यासाठी गैरअर्जदार याने प्रयत्न केल्याबाबत, किंवा अर्जदार हिला

कोणतही आर्थिक मदत केल्याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा समोर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचे शारीरिक व आर्थिक शोषण झाल्याचे समोर येते. तसेच, अभिलेखावरील **निशाणी क्र.१७** खाली अर्जदार हिने सादर केलेल्या तिच्या संपत्ती व उत्तरदायीत्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रावरून तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याचे सकृतदर्शनी समोर येते. तसेच, गैरअर्जदार क्र.१ यांनी कोणतेही संपत्ती उत्तरदयीत्वाबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही.

१६. गैरअर्जदार क्र.१ हा त्याच्या जिमच्या व्यवसायातून व इतर उत्पन्नाच्या साधनांमधून चांगले उत्पन्न मिळवत आहे, हे अर्जदार हिचे कथन गैरजअर्जदार क्र.१ याने त्याचे म्हणणे मांडून, खोडून काढलेले नाही. त्यामुळे, सकृतदर्शनी गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराच्या कथनांवर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त आहे. गैरअर्जदार क्र.१ याची पती म्हणून अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे, गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून अर्जदार ही प्रकरण दाखल झाल्यापासून अंतरिम पोटगी खर्चापोटी मिळण्यास पात्र राहते. प्राप्त परिस्थितीत महागाईचा विचार, तसेच दोघांच्या राहणीमानाचा विचार करता, अर्जदार हीस दरमहा रुपये ५,०००/- (रक्कम रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी अर्ज दाखल झाल्यापासून मिळण्यास अर्जदार पात्र राहाते. करिता मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देवून मुद्दा क्र.४ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ५,०००/- (रक्कम रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून, अर्ज दाखल तारखेपासून, मूळ

अर्जाचा निकाल लागेपावतो अथवा पुढील आदेश होईपावेतो द्यावेत.

३. सदरच्या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना निःशुल्क देण्यात यावी.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.09.29 [illegible] +0530

दिनांक – २६/०९/२०२५. **(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**

ठिकाण – पेठवडगांव. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग - पेठवडगांव.